!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३००/२७/०४/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शहर वाहतुकीला गती देण्यासाठी शहर बसची संख्या वाढवा : खासदार चंद्रकांत खैरे

## शहरालगतच्या औद्योगिक वसाहतींना वेळेनुसार बसची सुविधा देण्याची सुचना

**संभाजीनगर : ( ता.२७ )** दिवसेंदिवस वाढती वाहनाची संख्या लक्षात घेऊन परिवहन महामंडळाने आपली सेवा व महसुल उत्पन्न वाढविण्यासाठी शहर वाहतुकिला गती देऊन शहर बसची संख्या वाढवावी तसेच शहरालगतच्या औद्योगिक वसाहती व गावांना शहर बसची सुविधा देण्याची सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी राष्ट्रीय परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना केली.

यावेळी एस. टी. महामंडळाचे पाटील, शिवाजी बनकर, विजय सुबुकडे यांची उपस्थिती होती. सुभेदारी विश्रामगृह येथे झालेल्या बैठकित शहरात नाशिक व नांदेड शहरात छोट्या मिनी बसेसचा प्रस्ताव शहर विकास मंत्रालयाकडे पाठवण्यात आला. जुन महिण्यात शैक्षणिक सत्र सुरु झाले की, ग्रामीण भागासह शहरात विद्याथ्यांचा प्रवास वाढतो. खाजगी वाहतुकीमुळे प्रवाशात नेहमी वाद निर्माण होतो. त्या दृष्टीने शहर बस सुरक्षित व परवडेल अशा दरात मिळते. यामुळे नागरिक व विद्याथ्यांचे हित लक्षात घेऊन बसची संख्या वाढवावी. महाविद्यालये, मुख्य शाळा, विद्यापीठ औद्योगिक वसाहती, रहदारीचा मार्ग अशा ठिकाणी शहर बसची सुविधा देण्याची सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित केली. एस. टी. महामंडळाचे पाटील यांनी सांगितले की, शहरात मुख्य १० मार्गावर २७ शहर बस सुरु आहे. तसेच आणखी बस सुरु करण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**
**गणेश वाघ.**

**फोटो मेल केला आहे.**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५
cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com
8421415255/9420404329 8484066606/9604384400